सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १०९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ६ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वात जंतरमंतरवर कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन

### धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नवी दिल्ली**

कॉक्रोच जनता पार्टी चे आज दिल्लीतील जंतर मंतर येथे आंदोलन सुरू झाले आहे. हे आंदोलन अभिजीत दिपके यांच्या उपस्थितीत आंदोलन सुरू आहे. आंदोलनासाठी सायंकाळी ५ वाजेपर्यंत परवानगी देण्यात आली आहे. लडाखहून दिल्लीत आलेले प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुकदेखील या आंदोलनात सहभागी होणार आहेत. अभिजित दीपके यांनी सकाळीच आपल्या समर्थकांसह आंदोलनाची परवानगी घेतली.




कॉक्रोच जनता पार्टीने केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. नीट पेपरफुटी आणि सीबीएसई गुणपत्रिकेच्या वादामुळे पक्षाने त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. अभिजीत दीपके यांनी म्हटले आहे की, सरकार, सीबीएसई बोर्ड आणि एनटीए एजन्सीच्या निष्काळजीपणामुळे आणि हलगर्जीपणामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. आधी पेपरफुटी होते आणि मग कारवाईच्या नावाखाली केवळ बदली केली जाते. सरकारने पेपरफुटीविरोधात कठोर कायदे केले पाहिजेत.दरम्यान, आता या आंदोलनाला देशभरातून पाठिंबा मिळत आहे. सामाजिक कार्यकर्ते योगेंद्र यादव यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. त्यांनी एक कविता सादर करून आंदोलकांना प्रोत्साहन दिले. टीएमसीच्या राज्यसभा खासदार सागरिका घोष यांनी सीजेपी आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. त्यांनी इन्स्टाग्रामवर लिहिले, हार्दिक शुभेच्छा आणि पूर्ण पाठिंबा. योग्य लढा देत राहा!



दिल्ली पोलिसांनी आंदोलकांना पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्याकडे जाण्याऐवजी थेट जंतर मंतरकडे जाण्याचे निर्देश दिले आहेत. घटनास्थळी उपस्थित असलेले सीआरपीएफ, रॅपिड क्शन फोर्स आणि दिल्ली पोलिसांचे जवान लाऊडस्पीकरद्वारे सातत्याने शांततेचे आवाहन करत आहेत. दिल्ली पोलिसांनी जाहीर केले आहे की, निर्धारित रेषा ओलांडण्याचा किंवा पार्लमेंट स्ट्रीटच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही आंदोलकाला तात्काळ ताब्यात घेतले जाईल.

## १५ व्या वर्षी वैभव सूर्यवंशीची टीम इंडियात एन्ट्री!

### मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मुंबई** आयर्लंड आणि इंग्लंड मालिकेसह आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी बीसीसीआयने शनिवारी भारतीय टी-२० संघाची घोषणा केली. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली नव्या पर्वाची सुरुवात करताना निवडकर्त्यांनी खझङ हंगाम गाजवणाऱ्या १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीला तिन्ही संघात स्थान दिले आहे. भारतीय टी-२० संघात वर्णी लागताच वैभव सूर्यवंशीनं क्रिकेटचा देव आणि महान क्रिकेटर सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडीत काढला आहे. सर्वात कमी वयात भारतीय संघात निवड होण्याचा विक्रम आता त्याच्या नावे झाला आहे.




मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरची १९८९ मध्ये पाकिस्तान दौऱ्यासाठी प्रथमच भारतीय संघात निवड झाली होती. त्यावेळी सचिन तेंडुलकर यांचे वय १६ वर्षे १८१ दिवस होते. त्याने १६ वर्षे २०५ दिवस वयात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करून इतिहास घडवला होता. मात्र आता अवघ्या १५ व्या वर्षी वैभव सूर्यवंशीची भारतीय वरिष्ठ संघात निवड झाली असून त्याने सचिनचा हा विक्रम मागे टाकला आहे.

वैभव सूर्यवंशी याने आयपीएलच्या यंदाच्या हंगामात अक्षरश: धुमाकूळ घातला. क्रिकेट जगतातील नावाजलेल्या गोलंदाजांची धुलाई करत त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी परिपक्व असल्याचे दाखवून दिले. खझङ स्पर्धेत त्याने ७७६ धावा करत ऑरेंज कॅप पटकावली. एवढेच नाही तर या कालावधीत त्याने अनेक अशक्यप्राय वाटणारे विक्रम मोडित काढत नवे विक्रम प्रस्थापित केल्याचेही पाहायला मिळाले. त्याचे मोठे बक्षीस बीसीसीआयने त्याला दिले आहे.-

## शिवराज्याभिषेक हाच भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन

### रायगडावरून संभाजीराजेंची भावनिक साद, मानाचा मुजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६रायगड** -रायगडावर आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचा उत्साहपूर्ण जल्लोष पाहायला मिळाला. देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो शिवप्रेमी आणि शिवभक्त रायगडावर दाखल झाल्याने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. महाराजांच्या जयघोषाने गड दुमदुमून गेला असून विविध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ रोजी याच रायगडावर पार पडला होता. या ऐतिहासिक दिवसाची आठवण जपण्यासाठी दरवर्षी संभाजीराजे छत्रपती रायगडावर उपस्थित राहून शिवभक्तांना संबोधित करतात. यंदाही त्यांनी उपस्थितांना भावनिक शब्दांत संदेश दिला.



संभाजीराजे छत्रपती यांनी उपस्थितांच्या उत्साहाचे कौतुक केले. रायगडावर जमलेल्या जनसमुदायाचा उल्लेख करताना त्यांनी, हा केवळ जनसागर नाही, तर शिवसागर आहे, असे म्हटले. रायगडावर मर्यादित सुविधा असतानाही हजारो शिवभक्त अनेक दिवसांपासून मुक्काम करून या सोहळ्यासाठी उपस्थित राहतात, याबद्दल त्यांनी विशेष गौरव केला. राहण्याची, जेवणाची आणि इतर सुविधांची कमतरता असूनही शिवभक्त मोठ्या श्रद्धेने रायगडावर येतात, हेच महाराजांविषयीचे प्रेम आणि निष्ठा दर्शवते, असे त्यांनी नमूद केले.

संभाजीराजे पुढे म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून गडावर मुक्काम करणाऱ्या शिवभक्तांचे समर्पण पाहून ते स्वतःही भावूक झाले आहेत. रात्रीची व्यवस्था, दैनंदिन गरजा आणि अनेक अडचणी असूनही हजारो लोक फक्त छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन करण्यासाठी येथे दाखल झाले आहेत.

## माणसं पैशापेक्षा प्रेमानं जिंकता येतात

### देवेंद्र फडणवीसांचे सुप्रिया सुळेंना उत्तर

### म्हणाले-निवडणूक प्रक्रियेत परिवर्तन व्हावे, कोणी विधेयक आणले तर पाठिंबाच



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मुंबई** राज्यातील विधान परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. महाविकास आघाडीतील काही उमेदवारांनी शेवटच्या टप्प्यात निवडणुकीतून माघार घेतल्याने महायुतीला फायदा झाल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला आहे. याच मुद्द्यावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी या निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात घोडेबाजार झाल्याचा दावा केला होता. तसेच अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी लोकसभेत विधेयक मांडण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या आरोपांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता थेट प्रतिक्रिया देत राजकीय चर्चांना नवे वळण दिले आहे.

नवी मुंबई येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस यांनी सुप्रिया सुळे यांच्या आरोपांना उत्तर दिले. माणसं पैशांपेक्षा प्रेमानं जिंकता येतात, हे समजलं तर अशा प्रकारचं विधेयक आणण्याची गरजच पडणार नाही, असे ते म्हणाले. मात्र, निवडणूक प्रक्रियेत सुधारणा व्हायला हव्यात, या मताशी त्यांनी सहमती दर्शवली. या संदर्भात कोणी विधेयक आणत असेल तर त्याला आपला विरोध नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. निवडणूक व्यवस्थेत आवश्यक बदल झाले पाहिजेत, असे मत व्यक्त करत त्यांनी या विषयावर संतुलित भूमिका मांडली.

याचवेळी कोकण विधान परिषद मतदारसंघातील घडामोडींवरही फडणवीस यांनी भाष्य केले. ठाकरे गटाचे उमेदवार बाळ माने यांनी निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर ते भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू आहे. यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, बाळ माने पूर्वीपासूनच आमच्याशी संबंधित होते. भाजपमध्ये अंतिम निर्णय हा पक्षाध्यक्षांचा असतो. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य असेल. मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर पक्ष कार्यकर्ता म्हणूनही मी त्याच निर्णयाचा आदर करेन, असे त्यांनी स्पष्ट केले.

#### सुप्रिया सुळे यांची भाजपवर टीका

दरम्यान, सुप्रिया सुळे यांनीही भाजपवर जोरदार टीका करत आपली भूमिका कायम ठेवली आहे. अलीकडील अनेक निवडणुकांमध्ये घोडेबाजार होत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच विरोधी पक्षांच्या उमेदवारांवर दबाव आणण्यासाठी तपास यंत्रणांचा वापर केला जात असल्याचेही त्या म्हणाल्या. महाविकास आघाडीला माघार आघाडी, म्हणून हिणवणाऱ्या भाजप नेत्यांवर निशाणा साधताना त्यांनी भाजपने मला तोंड उघडायला लावू नये, असा इशाराही दिला. आपण सुसंस्कृत असल्यामुळे अनेक गोष्टी बोलत नसल्याचे त्यांनी नमूद केले. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका महाविकास आघाडी पूर्ण ताकदीने लढणार असल्याचे सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे येत्या काळात निवडणूक प्रक्रियेवरील चर्चा आणि राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

## नवनीत राणांची राज्यसभेसाठी मोर्चेबांधणी?

### सुनेत्रा पवारांची भेट, फडणवीसांशी चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मुंबई**

महाराष्ट्रातील रिक्त झालेल्या राज्यसभा जागेवरून राजकीय घडामोडींना वेग आला असून विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातील ही जागा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झाली आहे. या जागेसाठी भाजप नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांचे नाव चर्चेत आल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे नवनीत राणा यांनी अलीकडे सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या भेटीचा राज्यसभा उमेदवारीशी संबंध असल्याची चर्चा सुरू झाली आहे.



राज्यसभा जागेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत वातावरणही चर्चेचा विषय ठरत आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे देखील या जागेसाठी इच्छुक असल्याचे बोलले जात आहे. मात्र नवनीत राणा यांच्या नावाची चर्चा वाढताच पक्षातील काही नेत्यांमध्ये नाराजी असल्याच्या चर्चा समोर येत आहेत. पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत पार्थ पवार यांच्या गटाचा प्रभाव वाढत असल्याचेही काही नेत्यांकडून सांगितले जात आहे. राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदावरून प्रफुल्ल पटेल यांचे नाव वगळल्यानंतर ते फारसे सक्रिय दिसत नसल्याची चर्चा आहे. त्याचबरोबर सुनील तटकरे यांच्याबाबतही अस्वस्थतेच्या चर्चा सुरू असल्याने पक्षातील अंतर्गत समीकरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

या राज्यसभा जागेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ८ जून असल्याने इच्छुक नेत्यांनी हालचाली वाढवल्या आहेत. विविध स्तरांवर संपर्क, बैठका आणि चर्चा सुरू असून उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्न तीव्र झाले आहेत. पक्ष नेतृत्व अखेर कोणावर विश्वास दाखवते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, पुणे विधान परिषद निवडणुकीत पक्षाबाहेरील विक्रम काकडे यांना उमेदवारी दिल्यानंतर आता राज्यसभा जागेबाबत कोणता निर्णय घेतला जातो, यालाही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## ठाकरे गटाला कोकणात धक्का?:वैभव नाईक एसीबीच्या रडारवर, मालमत्तेची माहिती मागवली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मुंबई-** कोकणातील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे प्रमुख नेते आणि माजी आमदार वैभव नाईक हे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. रत्नागिरी येथील भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने (एसीबी) त्यांच्या मालमत्तेबाबत माहिती गोळा करण्याची प्रक्रिया सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात राजकीय चर्चांना वेग आला आहे. कणकवली नगरपंचायतीला पत्र पाठवून वैभव नाईक यांनी खरेदी केलेल्या मालमत्तांबाबत तपशील मागवण्यात आला आहे. विशेषतः २००२ आणि २००६ या वर्षांत त्यांनी विकत घेतलेल्या दुकान गाळ्यांची



माहिती एसीबीकडून तपासली जात आहे. संबंधित गाळे एक आहेत की दोन स्वतंत्र मालमत्ता आहेत, याची खातरजमा करण्यासाठी नगरपंचायतीकडे चौकशी करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वैभव नाईक यांच्याबाबतची चौकशी २०२२ पासून सुरू आहे. या पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना त्यांनी कोणत्याही चौकशीला सामोरे जाण्याची तयारी असल्याचे स्पष्ट केले. आपल्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न झाला तरी आपण मागे हटणार नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच गेल्या अनेक वर्षांपासून आपली चौकशी सुरू असून इतर अनेक प्रकरणांतील चौकशा बंद झाल्या, मात्र स्वतःच्या बाबतीत तपास अद्याप सुरू असल्याने हा अन्याय असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. याविरोधात आपण कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने लढा देणार असल्याचेही त्यांनी म्हटले.

## शासकीय जमीन हस्तांतरण, पुनर्विकासाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय, प्रशासन अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ नागपुर-** शासकीय जमिनींची विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास आणि वापरात बदल मंजुरीचे राज्य शासनाचे अधिकार आता थेट जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तस्तरावर विकेंद्रित करण्यात आले आहेत.महाराष्ट्र जमीन महसूल संहितेनुसार हा बदल झाला असून, यामुळे प्रसासन गतिमान तर होईलच शिवाय जनतेचा पैसा, वेळ , प्रवास यामुळे वाचेल.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेने महसूल




मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला असून शासनाचे परिपत्रकही काढण्यात आले आहे.शासकीय जमिनींची विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास, अतिरिक्त एफएसआय (ऋडख) किंवा टीडीआर (ढऊठ) वापरण्यासाठी आतापर्यंत जनतेला ल मंत्रालयाची मान्यता लागत असे. आता हे पूर्ण अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्यामुळे स्थानिक पातळीवरच फायलींचा वेगाने निपटारा होईल. प्रशासकीय गतिमानता वाढवण्यासाठी पूर्वीच्या २८ डिसेंबर २०१५ व १७ सप्टेंबर २०१६ रोजीच्या अधिसूचना रद्द करण्यात आल्या आहेत.

## संपादकीय ......

# लढाईआधीच तलवार म्यानात!

*एखाद्या सैन्यदलाच्या प्रमुखाने मोठ्या तावातावाने शत्रूपक्षाच्या सैन्याला लढाईत दोन हात करण्याचे आव्हान द्यावे, आपल्या सैन्यदलातील प्रमुख योद्ध्यांची निवड करून त्यांच्या खांद्यांवर शत्रूपक्षाला नामोहरम करण्याची जबाबदारी टाकावी. युद्धाची संपूर्ण रणनीती आखून देत त्यांना चिलखत घालावे, ओवाळणी करून घोड्यावर स्वार करावे आणि युद्धाचा दिवस उजाडताच या तथाकथित योद्ध्यांनी रणांगणावर जाऊन आपल्या शौर्याची झलक दाखवण्याऐवजी चिलखतच काय तर अंगातली वस्त्रे काढून ढुंगणाला पाय लावून तिथून पळ काढावा, यापेक्षा मोठी नामुष्की कुठल्याही सैन्यप्रमुखासाठी असू शकत नाही. अशीच काहीशी अवस्था सध्या महाविकास आघाडीची झाली आहे. महाविकास आघाडीच्या एक-दोन नव्हे तर तब्बल ६ उमेदवारांनी ऐनवेळी विधान परिषद निवडणुकीच्या रणांगणातून पळ काढल्याने लढाईआधीच महायुतीच्या ६ प्रतिस्पर्धी उमेदवारांचा विजय झाला आहे. तोदेखील बिनविरोध. होय. या उमेदवारांपुढे एकही उमेदवार नसल्याने हे सहाही जण मतदानाआधीच बिनविरोध निवडून आलेत. भारतीय लोकशाहीचे हे अद्भुत वैशिष्ट्य म्हणावे लागेल.*

*सध्या महाराष्ट्रात विधान परिषदेच्या १७ प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकीची जोरदार हवा आहे. या निवडणुकीच्या अर्ज माघारीचा गुरुवारी शेवटचा दिवस होता. हा दिवस अत्यंत नाट्यमय घडामोडींनी रंगला. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या ज्या ज्या नेत्यांना पक्षनेतृत्वाने मोठ्या विश्वासाने उमेदवारीचे टिळे लावले होते, त्यापैकी ६ उमेदवार पक्षनेतृत्वाचा विश्वासघात करून ऐनवेळी शत्रूपक्षाच्या तंबूत शिरले. ठाकरे गटाच्या नाशिकच्या नेत्यांनी पक्षाने उमेदवारी देऊनही निवडणूक लढवायची नाही म्हणत आधीच हाराकीरी केली होती. पाठोपाठ छत्रपती संभाजी नगर आणि कोकणातील उमेदवारांनी आपापले अर्ज माघारी घेतले. याचप्रमाणे काँग्रेसच्या वर्धा आणि यवतमाळच्या उमेदवारांनी आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या पुणे आणि ठाण्यातल्या उमेदवारांनीही अशाच प्रकारे माघार घेतली.*

*कोकणातील बाळ माने या ठाकरे गटाच्या उमेदवाराचा अर्ज मागे घेण्यासाठी तर चक्क भाजप नेते आणि मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे सोबत गेले होते, यावरून या निवडणुकीत किती प्रमाणात घोडेबाजार झाला असावा हे लक्षात येते. मागच्या काही वर्षातल्या निवडणुका बघितल्या असता, खासकरून विधान परिषद, जिल्हा परिषदा, नगर परिषदा, नगर पंचायती, महानगरपालिका या सर्व निवडणुकांमध्ये एक समान पॅटर्न दिसून येतो. तो म्हणजे कुठल्याही परिस्थितीत साम-दाम-दंड-भेद या सर्व अस्त्राचा वापर करून, फोडाफोडीचे राजकारण करून, पैशांच्या राशी रचून बिनविरोध निवडून येण्याचा सत्ताधार्यांकडून प्रयत्न होतो. आधी प्रतिस्पर्धी उमेदवाराला घेरायचे, कधी त्याला पैशाचे आमिष-प्रलोभने दाखवून, कधी धाक दाखवून आणि अगदीच नाही ऐकला तर तांत्रिक मुद्द्याच्या कारणावरून त्याला बाद करून बिनविरोध निवडून यायचे. त्यासाठी प्रसंगी निवडणूक आयोगाच्या अधिकार्यांचीही मदत घ्यायची. काही महिन्यांपूर्वी झालेल्या महापालिका निवडणुकीत असे अनेक प्रसंग घडले होते. दक्षिण मुंबईतील मतदारसंघात निवडणूक अधिकार्यांवर प्रतिस्पर्धी उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरण्यात आडकाठी केल्याचे आरोप झाले होते. त्यासंदर्भात चौकशीचे फार्सही झाले. पण निष्कर्ष काहीच निघाले नाही.*

*ऐन रणधुमाळीत उमेदवारी अर्ज मागे घेऊन मैदानातून पळ काढणे म्हणजे उमेदवारांच्या कचखाऊ वृत्तीचे जाहीर प्रदर्शन आहे. पक्षाने उमेदवारी जाहीर केल्यानंतर, कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह असतो. कार्यकर्ते आपल्या नेत्याला निवडून आणण्यासाठी रात्रीचा दिवस करतात, घाम गाळतात आणि पक्षाचा झेंडा खांद्यावर घेऊन लढायला सज्ज होतात. परंतु, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी हेच नेते बंद खोलीत जेव्हा राजकीय 'तडजोडी' करतात तेव्हा ज्या कार्यकर्त्यांनी पक्षासाठी स्वत:ला झोकून दिले, त्यांच्या पाठीत खंजीर खुपसला जातो. यामुळे त्या कार्यकर्त्यांचाही नैतिक पराभव होतो आणि त्यांचा पक्षावरील व नेतृत्वावरील विश्वास उडून जातो. अलीकडच्या काळात निवडणुकीच्या रिंगणातून शेवटच्या क्षणी माघार घेण्याची आणि प्रतिस्पर्ध्याला आयते 'वॉकओव्हर' देण्याची घातक प्रवृत्ती महाराष्ट्राच्या राजकारणात मूळ धरू लागली आहे. यातून सर्वसामान्यांचा मतदानाचा हक्क हिरावण्यासोबतच लोकशाहीचा गळा घोटला जात आहे. विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून होणार्या निवडणुकीमध्ये सर्वसामान्य नागरिक थेट मतदान करत नसले, तरी या निवडणुकीत जनतेने निवडून दिलेले स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी मतदान करतात. यामध्ये महानगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या लोकप्रतिनिधींचा समावेश असतो. मुळात हे लोकप्रतिनिधीच घोडेबाजार करून आल्याने अर्थात सरसकट सगळेच नाही, तरी त्यातले बहुतांश तरी, तेव्हा त्यांच्याकडून वेगळी काय अपेक्षा ठेवणार. तेही वाहत्या गंगेत धात धुवून घेणारच.*

*राहता राहिला प्रश्न महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा. काँग्रेसचा अपवाद वगळला तर शिवसेना आणि राष्ट्रवादीची आधीच दोन शकले झाली आहेत. त्यामुळे नेतृत्वाचीही विभागणी झाली आहे. अशा परिस्थितीत तुम्हाला पक्षनेतृत्वाचे आदेश पाळायचेच नव्हते, तर तुम्ही उमेदवारी घ्यायलाच नको होती की उमेदवारी घेऊन पक्षनेतृत्वाचा गळा कापण्यासाठीच असे विश्वासघातकी नेते महायुतीने महाविकास आघाडीच्या तंबूत आधीपासून घुसवून ठेवले होते. त्याची मविआच्या नेत्यांना सूतराम कल्पना नव्हती. असे असेल तर मागच्या चुकांमधून काहीच धडा न घेणार्या पक्षनेतृत्वाची अशीच अवस्था होणार. लढण्याआधीच मैदानातून पळ काढणारे नेतृत्व जनतेचे प्रश्न काय सोडवणार? हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे मविआतील पक्षनेतृत्वाने तडजोडीचे गाठोडे बाजूला ठेवून मैदानात उतरून लढण्याची हिंमत दाखवणारे कार्यकर्ते तयार करण्याची खरी गरज आहे. तेव्हाच कुठे महायुतीच्या फोडाफोडीच्या राजकारणात त्यांचा निभाव लागू शकेल. अन्यथा लढाईआधी तलवार म्यानात जातच राहणार.*

# महसूल कार्यालयातील दलालांवर कारवाई करा

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विभागीय आयुक्तांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांचा तातडीने निपटारा करावा तसेच महसूल कार्यालयांमध्ये दलालांची वाढलेली संख्या बघता त्यावर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने विभागीय आयुक्तांना निवेदन दिले. प्रत्येक सरकारी कार्यालयात स्वतंत्र हेल्प डेक्स तयार करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जिल्हाध्यक्ष अमित अढाऊ यांनी विभागीय आयुक्तांशी चर्चा करताना सांगितले की, विभागातील शेतकरी पीक नुकसान भरपाई, जमीन अभिलेख दुरुस्ती, फेरफार नोंदी, वारस नोंदी, पीक कर्ज, सिंचन, वीजपुरवठा आणि नैसर्गिक आपत्ती मदत यांसारख्या अनेक प्रश्नांमुळे त्रस्त झाले आहे. विविध शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना वारंवार शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहे. असून घेण्यात येते. अनेक महसूल त्याचाच फायदा या दलालाकडून कार्यालयांच्या परिसरात खासगी कार्यालय दलालांनी उघडपणे त्यांचे थाटले नागरिकांकडून पैसे घेऊन काम करून देण्याचे आश्वासन दिले जाते. त्यामुळे सर्वसामान्य शेतकरी आणि नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत आहे. शेतकऱ्यांना देखील योजनेची पूर्ण माहिती नसल्यामुळे या दलालांकडूनच काम करून घेण्याचा प्रयत्न केला जाते. जर शासनाच्या कुठल्याही योजनेसाठी एक रुपया खर्च न करता त्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळतो तर दुसरीकडे हे दलाल त्यांच्याकडून पैसे उकळतात म्हणूनच महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणांसाठी विशेष मोहीम राबविणे, पीक नुकसान भरपाई व अनुदान प्रकरणे तातडीने मंजूर करणे, फेरफार व वारस नोंदींसाठी कालमर्यादा लागू करणे, महसूल कार्यालयांतील दलालांची चौकशी करून कायदेशीर कारवाई करणे, निश्चित दलाली बंद करणे आणि सीसीटीव्ही कार्यालय परिसरातील अनधिकृत देखरेख वाढविण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.

प्रशासनाने प्रत्येक सरकारी नागरिकांच्या कार्यालयात तक्रारींसाठी स्वतंत्र हेल्प डेस्क सुरू करणे, तक्रार निवारण यंत्रणा अधिक प्रभावी करणे आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कामकाजाचे नियमित निरीक्षण करण्याची मागणी निवेदनाच्या माध्यमातून केली आहे.शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी प्रशासनाने करावी, अन्यथा लोकशाही मागनि या मागण्यांवर तातडीने कार्यवाही आंदोलन छेडण्याचा इशाराही स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आहे.निवेदन देताना अमित अढाऊ शिरभाते, दिनेश आमले, स्वप्निल यांच्यासोबत अनिल पवार, प्रशांत भुयार, स्वप्निल कोठे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# आदि मानव ते यंत्र मानव



*गुहेत राहणाऱ्या, दगडी हत्यारे वापरणाऱ्या आदि मानवापासून ते कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्सच्या युगातील यंत्र मानवापर्यंतचा प्रवास अत्यंत रोमांचकारी आहे. हा प्रवास केवळ तांत्रिक प्रगतीचा नसून मानवी बुद्धिमत्ता, जिज्ञासा आणि सर्जनशीलतेच्या उत्क्रांतीचा प्रवास आहे.आदि मानवाचे जीवन निसर्गाशी एकरूप झालेले होते. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी तो संघर्ष करीत होता. कालांतराने त्याने अग्नीचा शोध लावला, शेती शिकली, चाकाचा शोध लावला आणि सभ्यतेची पायाभरणी केली.*

**डॉ. शुभांगी अरुण जोशी**
M.९६०७६७३८५०

*या शोधांनी मानवाला केवळ जगण्याची नव्हे तर प्रगत होण्याची दिशा दिली.औद्योगिक क्रांतीनंतर यंत्रांचे महत्त्व वाढू लागले. मानवी श्रमांची जागा यंत्रांनी घेतली. संगणकाच्या शोधानंतर माहिती आणि ज्ञानाच्या क्षेत्रात क्रांती झाली.मात्र या प्रगतीच्या प्रवासात एक प्रश्न सतत अस्वस्थ करतो. मानव खरोखर विकसित झाला आहे की तो हळूहळू यंत्र मानव बनत चालला आहे?पूर्वीचा मानव साधनांनी गरीब असला तरी भावनांनी समृद्ध होता. नाती, माणुसकी, जिव्हाळा, सहकार्य आणि संवेदनशीलता हे त्याच्या जीवनाचे अविभाज्य घटक होते. शेजाऱ्याच्या दुःखात धावून जाणारी माणसे होती. कुटुंबातील संवाद हा आनंदाचा आणि आधाराचा स्रोत होता. माणसाकडे वेळ कमी नव्हता, पण माणसांसाठी वेळ भरपूर होता.आज परिस्थिती बदलली आहे. तंत्रज्ञानाने जीवन सुलभ केले, पण त्याच वेळी माणसांमधील अंतर वाढवले. मोबाईल, संगणक आणि सोशल मीडियाच्या आभासी जगात माणूस इतका गुंतला आहे की त्याला स्वतःच्या माणसांसाठी वेळ उरलेला नाही. घरात चार माणसे एकत्र असतात, पण प्रत्येकाचे लक्ष वेगवेगळ्या स्क्रीनवर असते. संवाद कमी झाला आहे आणि नाती औपचारिक होत चालली आहेत.आजचा मानव भावनांपेक्षा व्यवहाराला अधिक महत्त्व देऊ लागला आहे. यश, पैसा, प्रतिष्ठा आणि स्पर्धा यांच्या शर्यतीत तो धावत आहे. दुसऱ्याच्या वेदना पाहून मन हेलावण्याऐवजी तो पुढे निघून जातो. एखाद्याच्या दुःखाची बातमी सोशल मीडियावर लाईक किंवा सॅड इमोजी देऊन संपते. संवेदनांचा ओलावा कमी होत चालला आहे आणि माणूस नकळत यंत्रासारखा वागू लागला आहे.यंत्रांप्रमाणेच आजचा मानवही वेळापत्रकानुसार जगतो, काम करतो, धावतो; पण थांबून स्वतःकडे किंवा इतरांकडे पाहण्याची त्याच्याकडे फुरसत नाही. त्याच्या चेहऱ्यावर हसू असते, पण मनात ताण असतो. संपर्कांची संख्या वाढली आहे, पण संबंधांची खोली कमी झाली आहे.यंत्र मानव होणे म्हणजे शरीराने यंत्र बनणे नव्हे, तर भावना, संवेदना आणि माणुसकी हरवणे होय. ज्या दिवशी दुसऱ्याच्या आनंदात आनंद आणि दुःखात वेदना जाणवेनाशी होईल, त्या दिवशी मानवाचा यंत्र मानवाकडे प्रवास पूर्ण झालेला असेल.म्हणूनच आज गरज आहे ती तंत्रज्ञानाला दोष न देता, माणुसकी जपण्याची. विज्ञानाचा स्वीकार करताना संवेदनशीलता, प्रेम, करुणा आणि नात्यांचा जिव्हाळा जपणे आवश्यक आहे. कारण प्रगतीचे खरे मोजमाप यंत्रांच्या वेगाने नव्हे, तर माणुसकीने, संवेदनशीलतेने होत असते.आजचा मानव तंत्रज्ञानाचा निर्माता आहे; परंतु भविष्यात तो तंत्रज्ञानाचा गुलाम बनणार नाही ना, हा प्रश्न विचार करण्यास भाग पाडतो. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उपयोग मानवकल्याणासाठी व्हावा, मानवतेच्या मूल्यांना धक्का पोहोचविण्यासाठी नव्हे. यंत्रे ही माणसाची सहाय्यक असावीत, पर्याय नव्हे.आदि मानवापासून यंत्र मानवापर्यंतचा प्रवास हा मानवी बुद्धिमत्तेच्या सामर्थ्याचा पुरावा आहे. परंतु या प्रवासात मानवाने आपल्या संवेदनशीलतेचे, नैतिकतेचे आणि माणुसकीचे भान जपणे अत्यावश्यक आहे. कारण जग कितीही आधुनिक झाले तरी यंत्र मानव कधीही माणसाच्या हृदयातील प्रेम, सहानुभूती आणि माणुसकीची जागा घेऊ शकणार नाही.*

# नीट पेपरफुटीविरोधात मशाल मोर्चा

## केंद्र सरकार, मोदी, शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान विरोधात नारेबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

राष्ट्रीय टेस्टींग एजन्सीमार्फत (एनटीए) वैद्यकीय महाविद्यालय प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षेचा (नीट) पेपर लीक प्रकरणी देशभर संतापाची लाट उसळली आली. या पेपर फुटीच्या निषेधार्थ नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडियाकडून शुक्रवारी (ता. पाच) सायंकाळी मशाल मोर्चा काढण्यात आला.

सायंकाळी ७ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (ईर्विन) येथून महामानवाला अभिवादन करून मोर्चाला सुरुवात झाली. यावेळी शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी हातात मशाल घेऊन सहभागी झाले होते. यावेळी केंद्र सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या विरोधात तीव्र नारेबाजी करत निषेध व्यक्त केला.





मशाल मोर्चाचे जयस्तंभ चौकात समापन झाले.तत्पूर्वी, शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत हा मोर्चा जयस्तंभ चौकातील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ पोहचला. मशाल मोर्चाद्वारे केंद्र सरकारच्या परीक्षा व्यवस्थेवर टीका करत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या तत्काळ राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच वारंवार पेपर लीकच्या घटनांमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या राष्ट्रीय परीक्षा संस्था बरखास्त करण्याची मागणीही एनएसयूआयने यावेळी केली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष विनोद जाखड म्हणालेकी, नीट पेपर लीक प्रकरणामुळे देशातील शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे त्यामुळे ही लढाई शेवट पर्यंत लढणार आहे.

विद्यार्थी च्या भविष्यासोबत खेळणारे मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्वरित राजीनामा द्यावा अशी मागणी जाखड यांनी रेटून धरली.या मार्चात माजी मंत्री अ‍ॅड. यशोमती ठाकूर, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, खासदार बळवंत वानखडे, भैया पवार सह अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते.

### जयस्तंभ चौकात कार्यकर्त्यांचा ठिय्या

जयस्तंभ चौक येथे मोर्चा पोहचल्यानंतर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संतप्त आंदोलकांनी रस्त्यावर ठिय्या मांडून केंद्र सरकार विरोधात नारेबाजी केली. यावेळी संतप्त विद्यार्थ्यांनी, कार्यकर्त्यांचा रोष दिसून येत होता.

# विश्व पर्यावरण दिनी 'आपले शहर-हिरवे शहर' अभियानाचा शुभारंभ

## जुळवा नगरीत वृक्षारोपण उत्साहात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अचलपूर :**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५ जून रोजी आदिवासी पर्यावरण सामाजिक विकास संघटना व नगर परिषद अचलपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'आपले शहर-हिरवे शहर' या अभियानांतर्गत जुळवा नगरी येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्राणवायू स्रोत ठरणाऱ्या विविध रोपांची लागवड करून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.गेल्या काही वर्षांत वाढते तापमान, ग्लोबल वॉर्मिंग आणि पर्यावरणीय असंतुलनामुळे जनजीवनावर गंभीर परिणाम होत आहेत. या संकटाची जाणीव ठेवून आदिवासी पर्यावरण सामाजिक विकास संघटना गेल्या १५ वर्षांपासून तालुक्यात विविध ठिकाणी वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणासाठी सातत्याने कार्यरत आहे. तसेच वृक्षतोडीविरोधात जनजागृतीही केली जात आहे.या कार्यक्रमाला नगराध्यक्ष रुपाली अभय माथने, मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड, संघटनेचे पदाधिकारी योगेश खानजोडे, अभियंता विशाल तांदळे, प्यारेलाल प्रजापती, सुरेश प्रजापती, संजय डोंगरे, शारदा उईके, मराठा सेवा संघाचे विजय गोंडचवर, क्रांती ज्योती संघटनेचे वसंतराव धोबे, रामदास मसने, राजेश पांडे, दयाराम चंदेले, जितेश मिश्रा, किशोर बाजपेयी, रामा चौधरी, विजय बोबडे, सलीम भाई यांच्यासह अनेक पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.यावेळी नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी नागरिकांना वाढदिवस, कौटुंबिक समारंभ किंवा अन्य आनंदाच्या प्रसंगी किमान एक झाड लावण्याचे आवाहन केले. संघटनेचे योगेश खानजोडे यांनी प्रत्येक कुटुंबाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे तसेच वृक्षतोडीला विरोध करावा, असे सांगितले. विजय गोंडचवर व वसंतराव धोबे यांनी ग्लोबल वॉर्मिंगच्या वाढत्या धोक्यांविषयी मार्गदर्शन करून पर्यावरण संरक्षणासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.'वृक्ष आहे तर जीवन आहे' हा संदेश देत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# बाजोरियांनी सोडला न्यायालयीन संघर्ष

## निवडणूक लढविण्याचे प्रयत्न थांबले

**विदर्भ प्रजासत्ताकदि.६अमरावती** विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी अत्यंत उत्सुक असलेले माजी आमदार विप्लव बाजोरिया यांनी अखेर माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचा उमेदवारी अर्ज बाद करण्याच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कायम ठेवल्यानंतर, बाजोरिया यांनी आता या प्रकरणाला सर्वोच्च न्यायालयात (सुप्रीम कोर्ट) न नेण्याचा 'निर्णय घेतला आहे. यामुळे अमरावती विधान परिषद निवडणुकीतील त्यांचे आव्हान आता पूर्णपणे संपुष्टात आले आहे.

हिंगोली-परभणी विधान परिषद मतदारसंघाचे माजी आमदार आणि शिवसेना (शिंदे गट) पक्षाशी संबंधित असलेल्या विप्लव बाजोरिया यांनी यंदा अमरावती मतदारसंघातून अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र, त्यांच्या उमेदवारी अर्जात आणि प्रतिज्ञापत्रात अनेक त्रुटी असल्याचा आक्षेप प्रतिस्पर्धी उमेदवारांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे नोंदवला होता. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी ३ जून रोजी दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर, आक्षेपांमध्ये तथ्य आढळल्याने विप्लव बाजोरिया यांचा अर्ज तांत्रिक कारणास्तव फेटाळला होता व त्यांना अपात्र घोषित केले होते.या निर्णयाविरोधात विप्लव बाजोरिया यांनी आपले वडील गोपीकिसन बाजोरिया यांच्यासह नागपूर उच्च न्यायालयात धाव घेतली होती.मात्र, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती कुंभळकर यांच्या न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय योग्य ठरवत बाजोरिया यांची याचिका फेटाळून लावली. हायकोर्टाच्या या कडक भूमिकेनंतर बाजोरिया सुप्रीम कोर्टात जातील अशी



शक्यता होती, परंतु त्यांनी तेथे याचिका दाखल न करण्याचा निर्णय घेतला. हायकोर्टाने नोंदवलेले कडक निरीक्षण पाहता सर्वोच्च न्यायालयाकडूनही दिलासा मिळण्याची शक्यता अत्यंत कमी होती. तसेच न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान निवडणूक प्रक्रिया थांबवली जात नसल्याने, बाजोरिया यांनी कायदेशीर लढाई थांबवून मैदानातून पूर्णपणे बाजूला होणेच पसंत केले.

# आठ वर्षांपूर्वीच्या गोंधळ प्रकरणात निर्दोष मुक्तता

## आजही दुय्यम निबंधक कार्यालयात 'गोंधळाचे राज्य'!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अचलपूर** : अचलपूर येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात २०१५ साली घडलेल्या कथित गोंधळ प्रकरणाचा तब्बल आठ वर्षांनंतर निकाल लागला असून न्यायालयानेगोविंद चरपटे यांची निर्दोष मुक्तता केली आहे. मात्र विशेष बाब म्हणजे ज्या कार्यालयातील कथित गोंधळाच्या प्रकरणावर न्यायालयीन पडदा पडला, त्याच कार्यालयात आजही हाणामाऱ्या, अरेरावी आणि दलालशाहीचे प्रकार सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. सन २०१५ मध्ये सह दुय्यम निबंधक कार्यालयात सुरू असलेल्या गहाणखत नोंदणी प्रक्रियेदरम्यान शासकीय कामकाजात हस्तक्षेप करून गोंधळ घातल्याचा आरोप गोविंद चरपटे यांच्यावर ठेवण्यात आला होता. या प्रकरणी तक्रार दाखल झाल्यानंतर पोलीस तपास, न्यायालयीन सुनावणी आणि साक्षीपुरावे यांची प्रक्रिया जवळपास आठ वर्षे सुरू राहिली. अखेर उपलब्ध पुरावे शंकातीतपणे आरोप सिद्ध करण्यास अपुरे असल्याचे नमूद करत न्यायालयाने ७ ऑगस्ट २०२३ रोजी चरपटे यांची निर्दोष मुक्तता केली. सरकारी पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता बी.आर. चव्हाण यांनी बाजू मांडली, तर आरोपीच्या वतीने ॲड. रविंद्र खोजरे यांनी युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा सखोल विचार करून न्यायालयाने आरोपीला दिलासा दिला. मात्र या




### कार्यालयातील मारामाऱ्या, शिवीगाळ आणि दलालशाहीवर मात्र प्रशासनाचे मौन

निकालानंतर अचलपूर -परतवाडा शहरात एक वेगळीच चर्चा रंगू लागली आहे. आठ वर्षांपूर्वीच्या कथित गोंधळ प्रकरणाचा शेवट न्यायालयाने केला असला, तरी आजही सह दुय्यम निबंधक कार्यालयातील वातावरण सुधरले आहे का, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत लोकांच्या म्हणण्यानुसार काही दिवसापूर्वी याच कार्यालयात दस्तलेखकांच्या हस्तकांमध्ये झालेली मारामारी, आणि कागदपत्रांची फेकाफेक यामुळे कार्यालय पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. उपस्थित नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कार्यालयात वाद, धक्काबुक्की आणि एकमेकांच्या अंगावर धावून जाणे हा नित्याचाच प्रकार बनला आहे. असे जनतेचे म्हणने आहे नागरिकांचा आरोप आहे की, कार्यालयातील काही मोजक्या दस्तलेखक व त्यांच्या हस्तकांची मक्तेदारी निर्माण झाली असून क्रमांक लावणे, कागदपत्रे स्वीकारणे आणि व्यवहारांमध्ये प्राधान्य मिळविणे यावरून वारंवार वाद निर्माण होत आहेत. कार्यालयात दलालशाहीचे जाळे वाढत असून सर्वसामान्य नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# नशीली सामग्रीविरोधी कारवाईसाठी पोलिस अधिकाऱ्यांची परिक्षेत्रीय कार्यशाळा; ११५ अधिकाऱ्यांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताकदि.६अमरावती :**
नशीली सामग्री (एनडीपीएस) प्रकरणांवरील तपास, कायदेशीर प्रक्रिया आणि प्रभावी कारवाई याबाबत पोलिस अधिकाऱ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यासाठी अमरावती परिक्षेत्रीय विभागाच्या वतीने स्थानिक विद्याभारती महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सकाळी १०.३० वाजता सुरू झालेली ही कार्यशाळा सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत चालली. या कार्यशाळेत एकूण ११५ पोलिस अधिकारी सहभागी झाले होते.अमरावती परिक्षेत्रातील अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा तसेच अमरावती ग्रामीण पोलिस विभागातील अधिकारी व पोलिस निरीक्षकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. नशीली सामग्रीविरोधी मोहिम अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.कार्यशाळेत अँटी नार्कोटिक्स सेलचे



पोलिस उपाधीक्षक गजानन विखे, नशीली सामग्री विशेष टास्क फोर्सचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मचाले, सेवानिवृत्त पोलिस अधिकारी सदानंद मानकर तसेच बालापूर पोलिस स्टेशनचे अधिकारी झोंडापे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी एनडीपीएस कायद्यांतर्गत कारवाई करताना घ्यावयाची काळजी, गुन्ह्यांची तपास प्रक्रिया, पुरावे संकलन, पंचनामा, आरोपींविरोधातील खटले सक्षम करण्यासाठी आवश्यक बाबी तसेच न्यायालयीन प्रक्रियेतील महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर माहिती दिली.यावेळी नशीली सामग्रीच्या प्रकरणांमध्ये तपासाची दिशा कशी असावी, आरोपींना न्यायालयात सादर करताना कोणत्या बाबींची पूर्तता आवश्यक आहे, तसेच दोषारोपपत्र मजबूत करण्यासाठी तपास अधिकाऱ्यांनी कोणती खबरदारी घ्यावी यावरही विशेष भर देण्यात आला. अनुभवी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष प्रकरणांच्या उदाहरणांद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन केले.कार्यशाळेदरम्यान अधिकाऱ्यांनी विविध शंकांचे निरसन करून तपास प्रक्रियेशी संबंधित अनुभवांची देवाणघेवाण केली. नशीली सामग्रीविरोधातील लढा अधिक परिणामकारक करण्यासाठी अशा प्रकारच्या प्रशिक्षण व मार्गदर्शन सत्रांची गरज असल्याचे मतही उपस्थितांनी व्यक्त केले.दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेमुळे सहभागी अधिकाऱ्यांच्या ज्ञानात भर पडली असून नशीली सामग्रीविरोधी कारवाई अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी त्यांचे मनोबल दुप्पट झाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. अशा उपक्रमांमुळे पोलिस दलाची कार्यक्षमता वाढून समाजात नशामुक्तीबाबत सकारात्मक संदेश पोहोचण्यास मदत होणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# उद्या पत्रकारांसाठी आरोग्यतपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती-**
अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघ तसेच महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने रविवारी (ता. सात) वॉलकट कम्पाउंड परिसरातील जिल्हा मराठी पत्रकार संघ



भवनात प्रसार माध्यमातील प्रतिनिधिंकरिता सकाळी आठ वाजेपासून आरोग्यतपासणी तसेच रक्तशर्करा तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात रामसाई हॉस्पिटल येथील हृदयरोग तज्ञ डॉ. नीलेश चांडक उपस्थित राहतील. 'हृदयरोग व जीवनशैली' याविषयावर त्यांचे मार्गदर्शनसुद्धा लाभणार आहे. यावेळी पत्रकारांची रक्ततपासणी केली जाईल. डॉ. नीलेश चांडक व होमिओ डॉक्टर्स असोसिएशनचे डॉक्टरसुद्धा आरोग्यतपासणी करतील. या कार्यक्रमाला सर्व पत्रकार तसेच त्यांच्या कुटुंबीयांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल, महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. स्वाती लबडे-पडोळे तसेच असोसिएशनचे सचिव डॉ. नंदकिशोर भुतडा यांनी केले आहे.

# यशवंत सोळंके पुन्हा अमरावतीचे डीसीपी

## शहराच्या कानाकोपऱ्याची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताकदि.६अमरावती**राज्य



सरकारने शुक्रवारी राज्य पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या बदल्यांची यादी जाहीर केली. राज्यातील विविध पदांवर कार्यरत असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नवीन नेमणुका केल्या आहेत. जारी केलेल्या आदेशानुसार, नागपूर नक्षलविरोधी कृती दलाचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक यशवंत सोळंके यांची अमरावती शहराचे पोलीस उपआयुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे.प्राप्त माहितीनुसार, यशवंत सोळंके यांनी यापूर्वी अमरावती शहरात पोलीस उपआयुक्त म्हणून काम केले आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कारवाया करण्यात आल्या. शिवाय, त्यांना शहराचा कानाकोपरा चांगलाच माहित आहे. नुकतेच, दोन आठवड्यांपूर्वी, त्यांच्या देखरेखीखाली राष्ट्रीय महामार्गावर लाखो रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला होता. या कारवाईमुळे सोळंके पुन्हा चर्चेत आले. अमरावती शहर पोलीसयंत्रणा अधिक प्रभावी करण्यासाठीहाप्रशासकीय बदल महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

# अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत कडूंचा दबदबा वाढला

## काँग्रेसचे मातब्बर नेते बँकेचे संचालक दयाराम काळे यांचा बच्चू कडू गटात प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**
शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळवून देण्यासाठी आक्रमक भूमिका घेणारे शिवसेना आमदार बच्चू कडू यांचा अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत दबदबा वाढला आहे. अध्यक्ष म्हणून त्यांचा कार्यकाळ अंतिम टप्प्यात असतानाच, त्यांनी बँकेत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. चिखलदरा तालुक्यातील काँग्रेसचे मातब्बर नेते आणि बँकेचे संचालक दयाराम काळे यांनी बच्चू कडू यांच्या गटात प्रवेश केल्यामुळे बँक संचालक मंडळात कडू समर्थकांची संख्या आता ११ वर पोहोचली आहे.२१ सदस्यीय संचालक मंडळात एका सदस्याची सदस्यता निलंबित असल्याने सध्या २० सदस्य कार्यरत आहेत. यामुळेबहुमत सिद्ध करण्यासाठी ११ सदस्यांची आवश्यकता होती, जी आता बच्चू कडू यांनी पूर्ण केली आहे. गेल्या सव्वातीन वर्षांपासून बच्चू कडू अध्यक्ष आणि अभिजीत ढेपे उपाध्यक्ष म्हणून बँकेचा



कारभार पाहत आहेत.

**दयाराम काळेंच्या प्रवेशाने कडूंचे पारडे भारी-** दयाराम काळे हे सहकार क्षेत्रातील धुरंधर नेते असून गेल्या २० वर्षांपासून जिल्हाबँकेवर संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या येण्याने विरोधी काँग्रेस गटाला मोठा धक्का बसला आहे.सध्या कडू यांच्या गोटात उपाध्यक्ष अभिजीत ढेपे, आनंदराव काळे, सुरेखा ठाकरे, जयकुमार पटेल, नरेशचंद्र ठाकरे,सुधाकर भारसाकळे पाटील, अजय मेहकरे, चित्रा डहाणे, सुनील वऱ्हाडे आणि आता दयाराम काळे यांचा समावेश आहे. या बहुमतामुळे आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या हिताचे धडाकेबाज निर्णय घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### आता होणार धडाकेबाज निर्णय

सुधाकर भारसाकळे यांच्या राजीनाम्यानंतर झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत बच्चू कडू यांनी काँग्रेसच्या वर्चस्वाला सुरुंग लावत विजय मिळवला होता. तेव्हापासून बँकेच्या प्रत्येक सभेत काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख आणि त्यांच्या साथीदारांनी कडू यांच्या निर्णयांना तीव्र विरोध केला होता. अनेकदा बहुमताअभावी कडू यांची कोंडी करण्याचा प्रयत्न झाला; परंतु आता स्पष्ट बहुमत मिळाल्यामुळे कडू यांच्या प्रस्तावांना अडथळा आणणे विरोधकांना अशक्य होणार आहे. पुढील तीन ते चार महिन्यांत जिल्हा बँकेची पंचवार्षिक निवडणूक होणार आहे. त्यातच राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीचा फायदा अमरावती जिल्ह्यातील सव्वादोन लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. या कर्जमाफीसाठी बच्चू कडू यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात तीव्र आंदोलन केले होते. आता बँकेवर पूर्ण नियंत्रण आल्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर हा बदल कडू यांच्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरणार आहे.-

# २२.२१ लाखांच्या मालमत्ता कर थकबाकीपोटी मालमत्ता सील

**विदर्भ प्रजासत्ताकदि.६ अमरावती**
अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या निर्देशानुसार शहरातील मालमत्ता कर थकबाकीदारांवर सुरू असलेल्या विशेष वसुली मोहिमेला अधिक गती देण्यात आली असून, त्याचाच एक भाग म्हणून आज मध्य झोन क्र. २ अंतर्गत राजापेठ परिसरात मोठी वसुली कारवाई करण्यात आली. मालमत्ता कराची तब्बल २२ लाख २१ हजार १२६ रुपये इतकी थकबाकी असलेल्या मालमत्तेला महानगरपालिकेच्या पथकाने सील केले.महानगरपालिका प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मध्य झोन क्र. २ अंतर्गत वार्ड क्रमांक इ-५ मधील मालमत्ता क्रमांक १३९०/१३९०/१ या मालमत्तेवर दीर्घकाळापासून मालमत्ता कराची मोठी थकबाकी प्रलंबित होती. संबंधित मालमत्ताधारकांना वेळोवेळी कर भरण्यासाठी नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. तसेच थकबाकी भरण्याबाबत वारंवार सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, अनेक संधी देऊनही कराचा भरणा करण्यात आला नाही. त्यामुळे अखेर महानगरपालिका प्रशासनाने कठोर भूमिका घेत संबंधित मालमत्तेवर सीलची कारवाई केली.शहरातील विकासकामे, मूलभूत सुविधा आणि नागरी सेवांसाठी मालमत्ता कर हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा



### अमरावती महानगरपालिकेची धडक कारवाई; थकबाकीदारांवर कठोर भूमिका

स्रोत मानला जातो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात थकबाकी असलेल्या मालमत्तांवर प्रशासन विशेष लक्ष ठेवून आहे.

मालमत्ता कराची थकबाकी वसूल करण्यासाठी महानगरपालिकेने विविध उपाययोजना राबविल्या असून, कर न भरणाऱ्या मालमत्ताधारकांवर जप्ती, सीलिंग आणि इतर कायदेशीर कारवाया करण्यात येत आहेत.आजची कारवाई मध्य झोनचे सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वसुली पथकाने सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून संबंधित मालमत्तेला सील लावले. या कारवाईदरम्यान सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी नर्मदा चव्हाण, निरीक्षक फैयाज खान तसेच वसुली लिपिक सुरज चावरे, स्वप्नील रामसे, धरम बिवाड आणि विशाल ढिक्याव यांनी सक्रिय सहभाग घेतला.महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शहरातील ज्या मालमत्ताधारकांकडे मोठ्या प्रमाणात मालमत्ता कराची थकबाकी आहे त्यांनी तात्काळ कराचा भरणा करावा. अन्यथा अशा थकबाकीदारांवर सीलिंग, जप्ती आणि इतर कठोर वसुली कारवाया करण्यात येतील. थकबाकी वसुली मोहिमेला पुढील काळात आणखी तीव्र करण्यात येणार असून, कोणत्याही थकबाकीदाराला सवलत दिली जाणार नसल्याचे महानगरपालिका प्रशासनाने सूचित केले आहे.

# अमरावती शहर बससेवा भंगार अवस्थेत निसर्ग संरक्षण संस्था व पर्यावरण विभागाचा अभ्यास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**
येथील निसर्ग संरक्षण संस्था आणि श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने अमरावती शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा लेखाजोखा मांडणारा एक अभ्यास प्रकल्प नुकताच पूर्ण केला. पर्यावरण दिनाचे औचित्य साधून निसर्ग संरक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेश एकघरे व पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. एस. पी. इंगोले यांनी या अभ्यास प्रकल्पाचे ठळक निष्कर्ष आज जाहीर केले. या अभ्यासातून अमरावतीच्या शहर वाहतूक व्यवस्थेसंबंधी अनेक धक्कादायक बाबी उघडकीस आल्या.

केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार कुठल्याही पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी प्रति एक लाख लोकसंख्येमागे किमान २० ते ४० बसेस असायला हव्यात त्या अनुषंगाने अमरावती महानगरपालिके जवळ एक सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था चालवण्यासाठी निदान १५० ते २०० बसेस असायला पाहिजेत. सुमारे १० लाख लोकसंख्या असलेल्या व १२५ चौरस



किलोमीटर विस्तार असलेल्या अमरावती महानगरपालिकेची स्थिती मात्र अत्यंत दारुण आहे. अमरावती शहरात सध्या फक्त ११ (अकरा) बसेस, केवळ सहा विविध मार्गांवर कशीबशी आपली सेवा देत आहेत. राज्यातल्या इतर सर्व मोठ्या शहरांमध्ये अमरावतीपेक्षा बसेसची संख्या कितीतरी जास्त आहे.

सदैव आर्थिक विवंचनेत असलेली मनपा मात्र शहर बससेवा पुरवणार्या खाजगी ठेकेदाराकडून ५.२३ प्रती किमी या दराने रॉयल्टी वसुल करते. अमरावती शहराची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कोलमडून पडण्याचे हेच प्रमुख कारण आहे. शहराला प्रधानमंत्री योजने अंतर्गत ई-बसेस प्राप्त झालेल्या नाहीत. इतर प्रत्येक मोठ्या शहराने त्या मिळाल्या आहेत. शहराचा विस्तार बघता ३२ विविध मार्गांवर शहर बस सेवा सुरू होणे गरजेचे आहे. पुरेशा बसेस नसल्याने ऑटो रिक्षाचे प्रमाण वाढले आहे, त्याने प्रदुषणही होते. बस गाड्यांमधील अस्वच्छता हा प्रश्न मोठ्या प्रमाणावर आढळून आला. खाजगी वाहतूकदारांकडून रॉयल्टी न आकारता त्यांना प्रोत्साहनात्मक अनुदान देऊन सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट करणे गरजेचे आहे. उच्च दर्जाच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी स्मार्ट, ए. आय. आधारित नियोजनाची गरज आहे. बस गाड्यांच्या शिस्तबद्ध वाहतुकीसाठी रियल टाईम मॉनिटरिंग सिस्टिम असत्यंत गरजेचे आहे. या अन्य काही सूचना या अभ्यासातून सूचविण्यात आल्या आहे. हा अभ्यास प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे यांचे सहकार्य लाभले. पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. मनिषा जाणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या अभ्यास प्रकल्पात प्रज्ञा मेश्राम, तेजल तायडे, नरसोबा गेडाम, राहुल पेंडोर या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.निसर्ग संरक्षण संस्थेतर्फे डॉ निशिकांत काळे यांनी अभ्यास प्रकल्प प्रमुख म्हणून काम बघितले.

# अमरावती विधान परिषद निवडणुकीत ‘व्होटांचा खेळा’ ठरणार निर्णायक

## रवी राणा फॅक्टर अजूनही सस्पेन्समध्ये, प्रवीण पोटे पाटील यांचे पारडे जड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषद निवडणुकांची रणधुमाळी रंगात आली असून अमरावती जिल्ह्यातील राजकीय समीकरणांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. १८ जूनपर्यंत मतदान प्रक्रिया पूर्ण होणार असून २२ जून रोजी दुपारी निकाल जाहीर होणार आहे. दरम्यान, अमरावतीतील निवडणुकीत मतांच्या गणितासह काही अनपेक्षित राजकीय घडामोडी निर्णायक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.राजकीय सूत्रांकडून मिळालेल्या




माहितीनुसार भाजपचे प्रवीण पोटे (पाटील), वंचित बहुजन आघाडीचे निलेश विश्वकर्मा आणि काँग्रेसचे हर्षजित देशमुख हे प्रमुख उमेदवार मैदानात आहेत. मात्र स्थानिक राजकीय वर्तुळात खरी लढत प्रवीण पोटे आणि निलेश विश्वकर्मा यांच्यातच होण्याची चर्चा रंगली आहे.धामणगाव रेल्वे येथील नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून उल्लेखनीय विजय मिळविल्यामुळे निलेश विश्वकर्मा यांची राजकीय ताकद अधोरेखित झाली होती. दुसरीकडे भाजपचे अनुभवी आणि संघटनात्मक बळ असलेले प्रवीण पोटे हे देखील मजबूत दावेदार मानले जात आहेत. काँग्रेसचे उमेदवार हर्षजित देशमुख यांचे नाव तुलनेने कमी परिचित असल्याने त्यांचा प्रभाव कितपत राहील, याबाबत राजकीय निरीक्षकांमध्ये साशंकता व्यक्त केली जात आहे.या निवडणुकीत सुमारे ४५२ मतांचे स्वतंत्र गणित महत्त्वाचे ठरू शकते. काही मतदारांच्या भूमिकेमुळे संपूर्ण निकालाचे चित्र बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शेवटच्या



टप्प्यातील राजकीय हालचालींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.दरम्यान, उमेदवारी अर्ज फेटाळल्यानंतर विप्लव बाजोरिया हे या निवडणुकीच्या शर्यतीतून जवळपास बाहेर पडल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. त्यामुळे त्यांच्या समर्थकांची भूमिका कोणाच्या बाजूने झुकते, याकडेही लक्ष लागले आहे.याशिवाय आमदार रवी राणा यांची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नसल्याने राजकीय वातावरणात उत्सुकता कायम आहे. राणा कोणत्या उमेदवाराला पाठिंबा देतात किंवा त्यांच्या प्रभावातील मतांचे ध्रुवीकरण कोणत्या दिशेने होते, यावरही निकालाचे गणित अवलंबून राहू शकते. त्यामुळे अमरावती विधान परिषद निवडणुकीत ‘व्होटांचा खेळा’ आणि ‘राणा फॅक्टर’ हे दोन्ही मुद्दे शेवटपर्यंत चर्चेचे केंद्रबिंदू राहण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.असे असले तरी आजच्या घडीला प्रवीण पोटे पाटील यांचे पारडे जड असल्याचे बोलल्या जात आहे.

# जिल्हा उपनिबंधक कार्यालयाची सावकाराच्या घरावर छापा

## ११ शेतकऱ्यांची सावकारी जाचातून सुटका

### ट्रॅक्टर, ट्रॉली, चारचाकी वाहनांसह शेतीसाहीत्य पीडितांना परत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती** वाढती महागाई, नापिकी, नैसर्गिक संकटाने ग्रासलेल्या शेतकऱ्यांनी मजबुरीने सावकाराच्या दारी जावे लागते. आता तर खरीप हंगाम तोंडावर आल्याने शेतकऱ्यांची स्थिती विदारक असताना जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने प्रथमच आंतरराज्यीय कारवाई करीत एमपीतील एक आणि जिल्ह्यातील १० अशाएकूण ११ शेतकऱ्यांची सावकारी जाचातूनमुक्तता केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, धामणगाव तालुक्यातील एका सावकाराने या शेतकऱ्यांकडून ट्रॅक्टर, ट्रॉली, चारचाकी वाहनांसह शेतीसाहीत्य जप्त केले होते. हे सर्व जप्त केलेले शेतीपयोगी साहित साहित पीडित शेतकऱ्यांना परत मिळाल्याने खरीप हंगामाच्या तोंडावर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने सदर व्यक्तींना न्याय दिला. आहे.

**प्रथमच आंतरराज्यीय कारवाई**

सहकारविभागाने आंतरराज्यीयप्रकरणात केलेली पहीलीच कारवाई असल्याने विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन, जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या मार्गदर्शनात वाटपाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यावेळी सहायक निबंधक राजेश भुयार, सहकार अधिकारी सुधीर मानकर, प्रविण कोहळे उपस्थित होते.

**सर्व जप्त साहित्य शेतकऱ्यांना परत**

सदरचे साहित्य त्यांचे असल्याची खात्री करण्यात आली. यामध्ये मध्यप्रदेश येथील शेतकरी जितेंद्र रमेशचंद्र राव यांचे एमपी ०४ जीबी ७३८७ क्रमाकाच्या वाहन असल्याचे लक्षात येताच जिल्हा उपनिबंधक कार्यालयाले त्यांच्याशी संपर्क करून वाहन परत केले. याशिवाय जिल्ह्यातील सुमारे १० पिडीतांना खरीपा हंगामापुर्वी शेती साहित्य परत केल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

२७ जंगम वस्तू जप्त

धामणगाव रेल्वे तालुक्यातील सावरा येथे गोपाल प्रभाकर टेकाडे यांचे घरी व त्यांच्या शेत शिवारात जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी धाड टाकली. सहायक निबंधक स्वाती गुडधे, सचिन पतंगे या पथक प्रमुखांच्या नेतृत्वात २ जानेवारी रोजी धाडीवझडतीची कारवाई केली होती. या कारवाईत संशयास्पद दस्तऐवज तसेच २७ जंगम वस्तू पथकाने जप्त केल्या होत्या.

**सुनावणी दरम्यान संपर्क**

यामध्ये मध्यप्रदेशातील एका वाहनासह ट्रॅक्टर, ट्रॉली, पंजी, तिनफाडी पल्टी नांगर, लेवलर, व्ही पास, पेरणी यंत्र, दोन फाडी पल्टी नांगर, रोटरवेटर आदी साहीत्यांचा समावेश होता. या प्रकरणी दत्तापूरपोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला. सदर प्रकरणी उपजिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्याकडे सुनावणी सुरू असताना जप्त करण्यात आलेल्या सर्व पिडींतांशी संपर्क करण्यात आला.

# ग्रामविकासाचे दोन वर्षांत २१ कोटींचे दायित्व थकित

## जिल्हा परिषद : दायित्व नव्या योजनेबाहेर, विकासासाठी ६२ कोटी ८८ लाखांचे नियोजन प्रस्तावित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती** जिल्हा परिषद बांधकाम विभागावर मागील दोन वर्षांतील विकासकामांचे २१ कोटी ४ लाख रुपये थकित आहेत. २०२६-२७ च्या नव्या नियोजनात हे दायित्व वगळून नवी कामे करावी लागतील. यावर्षी ग्रामीण रस्ते, इतर जिल्हा मार्ग व तीर्थक्षेत्र विकासासाठी सुमारे ६२ कोटी ८८ लाख रुपयांचे नियोजन प्रस्तावित आहे. थकित दायित्व वगळता रस्तेविकास व मजबुतीकरणासाठी ४१ कोटींचे नियोजन केले आहे. थकित दायित्व असलेल्या कामांमध्ये ग्रामीण रस्ते विकासासाठी




४१ कोटी, इतर जिल्हा मार्गासाठी १० कोटी आणि ‘क’ वर्ग तीर्थस्थळांच्या विकासासाठी १२ कोटींचे नियोजन केले जाणार आहे. जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत २०२६-२७ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद बांधकाम विभागाला ग्रामीण रस्त्याचा विकास व मजबुतीकरणसाठी २०२४-२५ आणि २०२५-२६ या वर्षातील २१ कोटी चार लाखांचे दायित्व आहे. सदर दायित्व वगळता यंदा रस्तेविकास व मजबुतीकरणासाठी सुमारे ४१ कोटींचे दीडपट नियोजन प्रस्तावित केले आहे. यामध्ये इतर जिल्हा मार्गासाठी १३ कोटी ३१ लाखांचे दायित्व वगळता दीडपट म्हणजेच १० कोटींचे आणि ‘क’ वर्ग यात्रास्थळाच्या विकासासाठी मागील दोन वर्षांत चार कोटी ३१ लाखांचे दायित्व बाकी आहे. सदर दायित्व वगळता बांधकाम विभागाकडून ग्रामीण रस्त्याचा विकास व मजबुतीकरण, इतर जिल्हा मार्गाचा विकास व मजबुतीकरण तसेच ‘क’ वर्ग यात्रास्थळांचा विकास करण्यासाठी सुमारे ६२ कोटी रुपयांचे जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेंतून झेडपी बांधकाम विभागाने दीडपट नियोजन प्रस्तावित केले आहे.

**दोन वर्षांत २१.०४ लाखांचे दायित्व**

जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे २०२४-२५ आणि २०२५-२६, अशा दोन वर्षात ६३ कोटींतून ग्रामीण रस्ते, इतर जिल्हा मार्ग आणि ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्र विकास आदी योजनेतून केलेल्या कामांचे सुमारे १३ कोटी ४२ लाख रुपयांचे दायित्व आहे. त्यामुळे सदर दायित्व वगळता उर्वरित ४२ कोटी ५९ लाख रुपयांच्या दीडपट २०२६-२७ साठी ६३.८८ लाख रुपयांचे नियोजन बांधकाम विभागाकडून प्रस्तावित असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# सुधाकर भारसाकळे यांच्यावर दर्यापूर विधानसभा प्रभारी संपर्क प्रमुखपदाची जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.६अमरावती**



सहकार क्षेत्रातील मातब्बर नेते सुधाकर पाटील काँग्रेस पक्षाला भारसाकळे यांनी सोडचिठ्ठी देऊन आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वात शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यांच्या या पक्षप्रवेशाचा प्रभाव आता स्पष्टपणे दिसू लागला असून, पक्षाने त्यांच्यावर दर्यापूर विधानसभा क्षेत्राची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, सुधाकर भारसाकळे यांची दर्यापूर विधानसभा प्रभारी संपर्क प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना सचिव संजय मोरे यांच्या स्वाक्षरीचे नियुक्तीपत्र भारसाकळे यांना सुपूर्द करण्यात आले. आगामी निवडणुका होईपर्यंत ही नियुक्ती प्रभावी राहणार असल्याचे संजय मोरे यांनी स्पष्ट केले आहे. सुधाकर भारसाकळे यांच्या नियुक्तीमुळे दर्यापूर मतदारसंघात शिवसेनेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होणार आहे. दर्यापूर हा पूर्वीपासूनच शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला असून, येथून पक्षाचे अनेक लोकप्रतिनिधी यांच्यापक्षप्रवेशामुळे आणि अनुभवामुळे दर्यापूर मतदारसंघातील शिवसेनेचे गतवैभव पुन्हा प्राप्त होईल, असा विश्वास स्थानिक कार्यकर्त्यांमधून व्यक्त केला जात आहे.

# लोकार्पण होऊनही सरकारी दवाखाना धूळखात

## कंझरा येथील गंभीर स्थिती, प्रशासनाची उदासीनता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६धामक** ग्रामीण भागातील जनतेला गावातच उत्तम आणि मोफत आरोग्यसेवा मिळावी, या उद्देशाने लाखो रुपये खर्चून कंझरा येथे भव्य सरकारी दवाखान्याची इमारत उभारण्यात आली. अत्यंत थाटामाटात या दवाखान्याचे लोकार्पणसुद्धा पार पडले. मात्र, उद्घाटनाचा नारळ फुटून महिने उलटले तरी हा दवाखाना अद्यापही कुलूपबंदच आहे.



ही इमारत आता धूळखात पडली असून, प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे परिसरातील रुग्णांचे मोठे हाल होत आहेत.

दवाखान्याचे लोकार्पण झाले तेव्हा परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण होते. आता उपचारासाठी शहराच्या ठिकाणी धाव घ्यावी लागणार नाही, अशी आशा रुग्णांना होती. परंतु, उद्घाटनाचा कार्यक्रम संपला आणि दवाखान्याचे दरवाजे पुन्हा बंद झाले ते आजतागायत उघडलेच नाहीत.


सध्या या सुसज्ज इमारतीभोवती गवताचे साम्राज्य पसरले असून, लाखो रुपयांचे वैद्यकीय साहित्य आतमध्ये धूळखात पडून आहे. जर दवाखाना सुरूच करायचा नव्हता, तर लाखो रुपये खर्च करून इमारत का बांधली? आणि घाईघाईने लोकार्पण उरकून जनतेच्या डोळ्यांत धूळ का फेकली? असा संतप्त सवाल आता कंझरा येथील ग्रामस्थ विचारत आहेत.

**गरिबांची फरफट सुरूच**

कंझरा आणि परिसरातील जवळपास तीन ते चार गावांतील नागरिक या दवाखान्यावर अवलंबून आहेत. सध्या गावात सरकारी वैद्यकीय सेवा उपलब्ध नसल्याने गरीब रुग्णांना किरकोळ आजारासाठीही सहा ते सात किलोमीटर दूर शहराच्या ठिकाणी जावे लागत आहे. ज्यांना प्रवास करणे शक्य नाही, त्यांना खासगी डॉक्टरांकडे जाऊन महागडे उपचार घ्यावे लागत असून, आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

## दर्यापुर पोलिसांची धडक कारवाई;

# तलवारीने केक कापून दहशत माजविणाऱ्या सहा तरुणांना अटक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ दर्यापुर २२**दर्यापुर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दर्यापुर पोलिसांनी विशेष मोहीम राबवून दहशत निर्माण करणाऱ्या सहा तरुणांना अटक केली. ५ जून रोजी बनोसा येथील अवधूत नगर परिसरातील काही युवक चारचाकी व दुचाकी वाहनांमधून तलवारी, चाकू व काठ्या घेऊन नारेबाजी करत मित्राचा वाढदिवस साजरा करण्यासाठी जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तत्काळ कारवाई करून अभय कैथवास, मोहित राऊत, श्रीकांत दाळू, अपूर्व लहाने, रितेश पखान आणि संचित मानकर यांना ताब्यात घेतले. आरोपींकडून एक तलवार, तीन धारदार चाकू, दोन दांडे, दोन चारचाकी वाहने, तीन दुचाकी, सहा मोबाईल असा एकूण १३.८१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तपासादरम्यान सार्वजनिक ठिकाणी तलवारीने केक कापणे, विनानंबर प्लेटची वाहने वापरणे, भरधाव वाहन चालविणे तसेच शहरात दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले. याप्रकरणी अवैध शस्त्र बाळगणे, बेकायदेशीर जमाव जमविणे आणि मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन यांसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेतील फरार साथीदारांचा शोध सुरू असून पुढील तपास दर्यापुर पोलीस करीत आहेत.

# जन्म-मृत्यू दाखल्यांसाठी सीआरएस पोर्टलची मर्यादा वाढवा

## महापौर श्रीचंद तेजवानी यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**



जन्म व मृत्यू दाखल्यांची वाढती मागणी आणि वितरणात होणारा उशीर बघता विभागाच्या अडचणी दूर करण्यासाठी जन्म मृत्यू दाखल्यासाठी सीएसआर पोर्टलची मासिक मर्यादा वाढवून देण्याची मागणी महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी केली आहे या संदर्भात तेजवानी यांनी जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांना पत्र दिले.

सध्या जुन्या जन्म-मृत्यू नोंदी सीआरएस पोर्टलवर नोंदविण्यासाठी दरमहा केवळ २ हजार प्रकरणाची मर्यादा आहे. महापालिकेच्या विस्तृत कार्यक्षेत्रामुळे आणि मोठ्या लोकसंख्येमुळे ही क्षमता अपुरी पडत आहे. शैक्षणिक प्रवेश, पासपोर्ट, आधार कार्ड, वारस प्रमाणपत्रतसेच विविध शासकीय कामांसाठी नागरिकांना जन्म-मृत्यू दाखल्यांची आवश्यकता हजारो अर्ज प्रलंबित राहत आहे. भासत असताना सध्या एकाच युजर आयडीद्वारे हॉस्पिटल मंजुरी, जिल्हा परिषद मंजुरी, डीईओ मंजुरी आदी कामे केली जात असल्याने कामकाजावर अतिरिक्त ताण येत आहे. त्यामुळे नागरिकांना दाखले उशीरा मिळत आहे. या पार्श्वभूमीवर पोर्टलवरील जुन्या नोंदींची मासिक मर्यादा २ हजारांवरून ५ हजारांपर्यंत वाढविण्यात यावी तसेच अतिरिक्त पाच उपनिबंधक आयडी मंजूर करण्यात यावेत, असे महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी पत्रात म्हटले आहे. यामुळे प्रलंबित जन्म-मृत्यू दाखल्यांचा निपटारा वेगाने होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# मान्सूनमध्ये वीज पडण्यापासून बचाव करण्यासाठी ‘दामिनी’ ॲप वापरण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती,** मान्सून काळात, ।विशेषतः जून आणि जुलै महिन्यांत वीज पडण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ होते. यामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर जीवित, वित्त आणि पशुहानी होते. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेसाठी भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाने विकसित केलेल्या ’दामिनी’ मोबाईल पच्या वापर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आशिष येरेकर यांनी केले आहे.

या पच्या माध्यमातून वीज पडण्याच्या संभाव्य घटनांची पूर्वसूचना सुमारे १५ मिनिटे आधी मिळू शकते. जीपीएस प्रणालीवर आधारित असलेले हे प वापरकर्त्याच्या सद्यस्थितीनुसार परिसरातील विजेची हालचाल आणि संभाव्य धोका दर्शविते, ज्यामुळे नागरिकांना वेळेत सुरक्षित ठिकाणी जाणे शक्य होते. ग्रामपातळीवरील सर्व स्थानिक व शासकीय अधिकारी तसेच



कर्मचाऱ्यांनी हे प डाऊनलोड करून, त्यातील अलर्टनुसार नागरिकांना पूर्वसूचना द्यावी आणि जीवितहानी टाळण्यासाठी सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केले आहे.

**असे डाऊनलोड करा ’दामिनी’ ॲप**

हे प मोबाईलमध्ये डाऊनलोड करण्यासाठी गुगल प्ले स्टोअरवर जाऊन ’ऊाळपळ ङ्खळसहींपळपस -श्रशीं’ असे शोधावे आणि अधिकृत प इन्स्टॉल करावे. प सुरू केल्यानंतर मोबाईलचे लोकेशन (ऋझड) सुरू करून आवश्यक परवानग्या द्याव्यात, तसेच वेळेवर सूचना मिळण्यासाठी नोटिफिकेशन सुविधा सुरू ठेवावी.जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषिसेवक, आपदा मित्र व सखी, कोतवाल, आशा वर्कर्स, सरपंच आणि पोलीस पाटील यांना या पचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, वीज आणि पूर या आपत्तींमध्ये ’काय करावे व काय करू नये’ याबाबत विनाईल बोर्डच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये जनजागृती करण्यात येत असल्याचे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

